विद्याधर शिंदे यांची वर्णी लागली आहे.

## 'केबीपी'मध्ये सायबर वॉरियर्स क्लब स्थापन

सातारा : वर्ये (ता. सातारा) येथील कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च आणि क्विक हील फाउंडेशन यांच्यात सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या राष्ट्रीय सायबर जनजागृती उपक्रमांतर्गत नुकताच सामंजस्य करार झाला. त्यानुसार इन्स्टिट्यूटमध्ये सायबर वॉरियर्स क्लब स्थापन केला. विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा, डिजिटल साक्षरता, नेतृत्व विकास आणि सामाजिक जनजागृती याबाबत विशेष प्रशिक्षण दिले जात आहे. या उपक्रमासाठी ओमकार कदम, पूजा शिंदे, धनराज तपासे, दिया सकुंडे यांची क्लब ऑफिसर्स म्हणून निवड झाली. या उपक्रमासाठी क्विक हील समन्वयक प्रा. मंथन जे. पंडित हे शिक्षक समन्वयक म्हणून मार्गदर्शन करतील. संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. डी. कुंभार, इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. बी. एस. सावंत हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील.